स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव, युवारंगचे उदघाटन फैजपुर येथील धनाजी नाना महाविद्यालयात उद्या शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी सिने व नाट्य कलावंत ओंकार भोजने यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान गुरूवारी अनेक महाविद्यालयांचे कलावंत विद्यार्थी फैजपुरमध्ये दाखल झाले.

सकाळी ९ वाजता कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली उदघाटन सोहळा होणार असून नाट्य कलावंत ओंकार भोजने हे उदघाटक आहेत. विशेष अतिथी आ. सुरेश भोळे, जिल्हा जळगाव बँकेचे माजी चेअरमन गुलाबराव देवकर, सहसंचालक प्रा. संतोष चव्हाण, केसीईई संस्थेचे अध्यक्ष श्री. नंदकुमार बेंडाळे हे उपस्थित राहणार आहेत.

या महोत्सवाचे स्वागत अध्यक्ष तापी परिसर विद्या मंडळ फैजपुरचे अध्यक्ष आ. शिरीषदादा चौधरी हे आहेत. युवारंगमध्ये १०४ महाविद्यालये आणि २००० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. महाविद्यालयाने महोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. पाच रंगमंचावर कलाप्रकार सादर होणार आहेत. दुपारी १ वाजता सुनितभाई बोंडे रंगमंच क्रमांक १ वर प्रहसन, तर कै. व्ही. डी. फिरके रंगमंच क्रमांक २ वर दुपारी भारतीय समूहगान सादर होईल. कै. घनश्याम पाटील रंगमंच क्रमांक ३ वर वक्तृत्व स्पर्धा, कै. वजीर तडवी रंगमंच क्रमांक ४ वर सुरवाद्य व तालवाद्य होईल. कै. बाजीराव पाटील रंगमंच क्रमांक ५ वर स्पॉट पेटींग आणि व्यंगचित्र या कलाप्रकाराच्या स्पर्धा होणार आहेत. एकुण २६ कलाप्रकाराच्या स्पर्धा होणार असून पथसंचलनाऐवजी पोस्टर प्रदर्शन होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महोत्सवाचे कार्याध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. राजेंद्र नन्नवरे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्राचार्य डॉ. पी. आर. चौधरी, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. सुनील कुलकर्णी, समन्वयक डॉ. शंकर जाधव, सहसमन्वयक डॉ. राकेश तळेले आदीनी केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ९ फेब्रुवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी